माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०४०/२०१७-१८
दि.२३/०३/२०१८.

<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>

श्री.शंकर अंकुश विरकर, ................अपिलार्थी
विरकर निवास बंगला, इंद्रलोक फेस २,
स्व.हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मैदानाच्या बाजूला,
भाईंदर (पूर्व), ता.जि.ठाणे ४०११०५.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: **<u>विवेचन</u>** :-

श्री.शंकर अंकुश विरकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.२९/०१/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना दिलेली पदोन्नती बेकायदेशीर असलेल्या बाबत खासदार, आमदार, महापौर, नगरसेवक यांनी दिलेले पत्र, लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न,पत्राची सत्यप्रत मिळणेव त्यांना दिलेल्या उत्तराच्या सत्यप्रत देण्यात यावी.

**<u>अपिल दाखल करण्याची कारणे:-</u>**
माहिती अधिकार अंतर्गत अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने अपिलार्थी यांनी दि.१२/०३/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**<u>सुनावणीचा तपशिल:-</u>**
अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२३/०३/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२४७/२०१८ दि.१८/०३/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.२९/०१/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना उर्वरित माहिती अभिलेखामध्ये उपलब्ध असल्यास देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास अपुर्ण माहिती दिलेली असुन उर्वरित माहितीबाबत अभिलेखाचा शोध घेऊन १० दिवसांत विनाशुल्क स्वरुपात माहिती देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रतिः-

१) श्री.शंकर अंकुश विरकर,
विरकर निवास बंगला, इंद्रलोक फेस २,
स्व.हिंदुऋदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मैदानाच्या बाजूला,
भाईंदर (पूर्व), ता.जि.ठाणे ४०११०५.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.